# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १०-०५-२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०३) इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक १० मे २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती श्री. रेणुकादास (राजू) वैद्य यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ११.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

०१) श्री. खान मुजीब मिर आलम खान
०२) श्री. गवळी रविकांत काशीनाथ,
०३) सौ.दलाल लता श्रीनिवास
०४) श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०५) श्री.दिलीप नारायण गायकवाड
०६) श्री.पांडे विनायक प्रभाकर
०७) डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
०८) श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
०९) श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
१०) श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
११) श्री.मो. जावेद मो.इसाक
१२) श्री.शिरसाट संजय पांडुरंग
१३) श्री.सावंत मधुकर दामोधर
१४) श्री.हाजी शेरखान अ. रहेमान

**डॉ. आशा बिनवडे :** भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय नेते व सरचिटणीस स्व. प्रमोदजी महाजन यांचे ३ मे रोजी दुखःद निधन झाले. यामुळे भारतीय जनता पार्टीचीच नव्हे तर देशाची मोठी हानी झालेली आहे. आणि त्यास्तव भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यालय व त्यांचे कुटुंबीयांना आपण सर्व त्यांचे दु:खात सहभागी असल्याचा शोक संदेश पाठविण्यात यावा व स्व. प्रमोद महाजन यांचे आत्म्यास शांती मिळावी यासाठी त्यांना या सभागृहा तर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

**सौ. लता दलाल :** यास माझे अनुदमोदन आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते व सरचिटणीस युतीचे शिल्पकार स्व. प्रमोद महाजन यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी व त्यांचे कुटूंबीयांना शोक संदेश पाठविण्यात यावा.

**मा.सभापती :** सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

(याच वेळी स्व.प्रमोदजी महाजन यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्री. विनायक पांडे :** मागील चार पाच बैठकीपूर्वी रॅबीज लसीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी असे सांगितले की, जे ७ लक्ष रुपये ठेवले आहे ते लॅप्स होवू देणार नाही व ताबडतोब निविदा काढून सदर रॅबीज लसीचे इजेंक्शन ७-८ दिवसांत येतील असा खुलासा केलेला होता, तरी सदर लस आलेली आहे की नाही,

आली असेल तर कोणत्या आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे याचा सविस्तर खुलासा करावा.

**प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी :** १ महिन्यापूर्वीच ॲडव्हॉन्स ऑर्डर केलेली होती. परवापर्यंत त्यांचेशी संपर्क केलेला आहे. आज किंवा उद्या ऑर्डर निघेल अशी त्याचेकडील माहिती आहे. चार पाच दिवसात लसीचे इंजेक्शन उपलब्ध होतील.

**श्री. विनायक पांडे :** किती रकमेची सलीचे इंजेक्शन मागविले आहे.

**प्र. आरोग्य वैद्य अधि. :** माझ्याकडे सध्या संचिका नसल्यामुळे माहिती नाही. संचिका मागवून माहिती देण्यात येईल.

**श्री.मो.जावेद मो. इसाक :** चिकन गुनीया हा मोठा आजार शहरातील नागरीकांना होत आहे. बालाजी इंजिनिअरींगचे श्री. मुळे म्हणून व्यक्ति आहे त्यांना चिकन गुनीयामुळे पॅरेलीसीस झालेला आहे. आरोग्य विभाग या बाबतीत काय कार्यवाही करीत आहे याचा खुलासा घ्यावा.

**श्री.हिम्मतराव दाभाडे :** वार्डातील साफसफाई व्हावी म्हणून ११२४ कर्मचारी भरती करण्यात आले. परंतू काही अधिकारी व संबंधीत स्वच्छता निरीक्षक यांनी मनमानी करुन काही कर्मचारी यांना जवान म्हणून काम दिलेले आहे. त्यामुळे स्वच्छता होत नाही कर्मचारी कमी पडतात. मनमानी व भ्रष्टाचार करुन त्या कर्मचाऱ्यांना जवान म्हणून नियुक्ती केलेली आहे, याची चौकशी करावी.

**मा.सभापती :** संपूर्ण घनकचऱ्याचे व्यवस्थापन कशा पध्दतीने चालते ? जे साथीचे रोग होत आहेत त्या बाबतीत काय उपाययोजना केलेली आहे. याचा आरोग्य अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्र. आरोग्य वैद्य अधि. :** २४ एप्रिल रोजी मी या पदाचा चार्ज घेतलेला आहे. तेंव्हापासून ज्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहे त्याची माहिती अशी की, आरोग्य केंद्रा मार्फत साथीचे रोग असलेले रुग्णाचे सर्वेक्षण करण्याचे काम सुरु केलेले आहे. यात २७ एमपीडब्ल्यू व ९० आरसीएच महिला मंडळ वर्ग तसेच ओपीडीचा व रजिष्ट्रेशनचा कर्मचारी वर्ग याचा समावेश करुन दिलेला होता. यामध्ये जवळपास ९ लक्षचा सर्वे १५ दिवसात केलेला आहे. यामध्ये तापाचे ४७५२ रुग्ण आढळले आहे. या सर्व रुग्णाचे रक्त नमुने तपासणीसाठी घेतलेले आहे. यापैकी २५ रुग्णांना चिकन गुनियाचे संशयीत रुग्ण आढळून आलेले आहे. दोन तारखेला आमच्या पथकाने शासकीय वैद्यकीय रुग्णालय, एमजीएम रुग्णालय व जे खाजगी रुग्णालये, डॉक्टर्स आहेत त्यांची एक बैठक घेतली. महापालिकेच्या स्तरावर आणि सर्वांना आवाहन करण्यात आले की जर तापाचे रुग्ण असतील तर ताबडतोब मनपाच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधावा.

**श्री. जावेद मो.इसाक :** मी नावासहीत चिकन गुनिया झालेले व्यक्ति श्री. मुळे यांचे नाव सांगत आहे. अधिकारी सांगतात सर्वे केला एकही रुग्ण नाही. परंतू श्री. मूळे हे आजही आजारी आहेत. त्यांचेवर औषधोपचार चालू आहे. खुलासा बरोबर वाटत नाही.

**श्री. रविकांत गवळी :** राज्यातच नव्हे तर गावागावात सर्वांच्या घराघरापर्यंत चिकन गुनिया, डेंग्यू सारखे आजार होत आहेत. माझ्या वार्डात किमान १०० लोक तापाने आजारी आहेत. आपण स्वतः काही दिवसांपूर्वी वसंत भुवन येथे मॅलेथॉन

पावडर बद्दल चौकशी केली होती. हे पावडर शासनाकडून येते. ते पावडर केंव्हा आले किती आले किती वापर झाला याचा खुलासा मिळालेला नाही. तरी त्या बाबतीत खुलासा व्हावा.

**श्री. हाजी शेरखॉन :** माझ्या वार्डातही ७० ते ८० % लोक त्रस्त आहेत. कोणीही अधिकारी यांनी येवून बघितले नाही.

**मा.सभापती :** स.सदस्य सांगतात वार्डात १०० वर रुग्ण आहेत अधिकारी सांगतात एकही रुग्ण नाही सविस्तर असा खुलासा संबंधित अधिकारी यांनी करावा.

**प्र.आरोग्य वैद्य.अधि. :** सर्वे केलेला आहे. सस्पेक्टेड आढळले त्यांची यादी घाटीत व माझेकडे आहे. घाटीत खाजगी दवाखान्याकडून माहिती मागविलेली आहे.

**श्री. गवळी रविकांत :** कुणीही सर्वेसाठी आलेले नाही. लोक यांचेकडे होवून येतील का चुकीची माहिती देत आहे.

**श्री. मिलींद दाभाडे :**माझ्या वार्डात सध्या ७० ते ८० व्यक्ति चिकन गुनिया या आजाराचे आहेत आताच काही महिलांना घाटी दवाखान्यामध्ये घेवून गेलो होतो. महानगरपालिकेने कोणतेही अधिकारी कर्मचारी यांनी त्यांचेशी संपर्क केलेला नसून मार्गदर्शनही केलेले नाही.

**प्र.आरोग्य वैद्य.अधि. :** घाटीमध्ये उपचार चालू आहे. २४ तारखेपासून एकूण ५३ रुग्ण घाटीमध्ये उपचार घेत आहेत.

**श्री. हिम्मतराव दाभाडे :** वार्ड क्र. ९२ हा श्री. मोरे यांचा वार्ड आहे. तेथे गरीब लोकांची वस्ती आहे. ४० लोक आजाराने पीडीत आहेत. आता त्वरीत वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे कर्मचारी वर्ग घेवून तेथील लोकांना औषधोपचार करावे.

**श्री. विनायक पांडे :** अधिकारी हे घाटी दवाखान्यातील रिपोर्ट घेवून माहिती देतात. परंतू सर्वच स. सदस्य त्यांचे वार्डात रुग्ण असल्याचे सांगत आहे. अनेक रुग्णांना घाटीमध्**ये** बाहेरच्या बाहेर पाठविले जात आह. ॲडमीट करुन घेतले जात नाही. स.स.श्री. के.व्ही. मोरे यांचे वार्डात नागसेननगर येथे आजही ४० रोगी आहेत. याची कल्पना वैद्यकीय अधिकारी यांना दिलेली आहे. फक्त गोळया दिल्या. पाहिजे तसे औषधोपचार केले नाही. प्रत्येक वार्डात १०० ते १५० रुग्ण आढळून येतील. परंतू त्यांना चिकन गुनिया आहे की नाही याची खात्री महानगरपालिकेच्या दवाखान्यातील डॉक्टरांनी केली नाही. रक्ताचे नमुने तपासले नाही.

**सौ. लता दलाल :** एका गंभीर विषयावर चर्चा होत आहे. शहरात चिकन गुनिया तसेच डेंग्यू रोगाची साथ आलेली आहे अनेक व्यक्ति या रोगाचे रुग्ण आहेत. आताच माहिती घेतली तर असे दिसून येईल किती आरोग्य केंद्रात आरोग्य अधिकारी त्या त्या केंद्रात किती वेळ हजर असतात. तेथे पुरेशी औषधी दिली नाही. माझ्या माहिती प्रमाणे आपण माहिती घेतली असता वसंत भुवन येथे जी औषधी ठेवलेली आहे मी मुदतबाहय झालेली होती अशा परिस्थितीत फॉगींग मशीन किती आहेत व किती मागविलेले आहे. औषधी फवारणी किती होते कोणत्या भागात होते याचाही खुलासा करावा. तसेच जी औषधी मुदत संपलेली आहे त्यानुसार औषधी मागविण्यासाठी काय प्रयत्न केलेले आहे. अनेक वैद्यकीय अधिकारी आरोग्य केंद्रावर सकाळी ९ ऐवजी ११-११.३० वाजता आलेले दिसतात. अनेक वैद्यकीय अधिकारी हे रजेवर

असतात. उशीरा येतात हे सर्व बंद व्हावे अशी विनंती आहे व या संपूर्ण प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

**श्री. संजय शिरसाट :** आरोग्य विभाग अस्तित्वात आहे की नाही हा प्रश्न पडतो. अनेक आरोग्य केंद्रावर वैद्यकीय अधिकारी कधीच दिसत नाही. शहरात डेंग्यू तसेच चिकन गुनियाचे आजार होत आहे. घाटी दवाखान्यात किती रुग्ण आहे याची माहिती घेतली. ६० ते ७० रुग्ण आहे, परंतू महापालिकेच्या आरोग्य केंद्रात किती रुग्ण आले होते याची माहिती नाही. तसेच हेही माहिती नाही की, स.सदस्य, माजी महापौर श्री. गजानन बारवाल यांचे कुटुंबातील सर्वांनाच चिकन गुनिया झालेला आहे. या विभागाचे काम करण्याची पध्दतच वेगळी आहे साथीचे रोग होत आहे म्हणून सर्वे करावा म्हणून केला. परंतू कर्मचारी इतके हुशार आहे की ते सर्वे करतांना नगरसेवकांना घरी जावून विचारणा करतात. डास, मच्छर दिसतात का? बाजूच्या घरात जावून विचारत नाही. आरोग्य केंद्रातील अधिकारी याची डयूटी केंव्हा असते कळायला मार्ग नाही. अनेक डॉक्टर हे अस्थायी होते त्यांची विनंती मान्य करुन त्यांना कायम करण्यात आले. आज ५ हजारा ऐवजी १७ ते १८ हजार त्यांना पगार दिला जातो. परवा माझ्याकडे एक परीपत्रकाची प्रत आली होती शहरात तापाचे रुग्ण आहेत. डॉक्टरांची वेळ वाढविलेली आहे. आरोग्य केंद्रात जास्त वेळ बसवावे म्हणून त्यावर वेळ दिली होती ९ ते १ वाजेपर्यंत दुपारी ३ ते ५ पर्यंत फक्त सहा तास होतात. या परीपत्रकापूर्वी ते डॉक्टर किती तास आरोग्य केंद्रात सेवा करीत होते माहित नाही. माझ्यामते सकाळी अर्धातास दवाखान्यात डॉक्टर थांबत असे. या शहरात अनेक डेंग्यू व चिकन गुनियाचे रुग्ण आहेत. नुकतीच श्री. डांगे यांचे वार्डातील एक मुलीचे निधन झाले. हे माहित झाल्यानंतर त्या वार्डात जावून फवारणी करतात. हे चित्र महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे आहे. आरोग्य विभागामध्ये कामाची सुसूत्रता नाही. गेल्या सहा वर्षाच्या कालावधीत डॉक्टराची एकत्रित बैठक झाली व सर्व कामाला लागले असे कधीही आढळून आले नाही. काही डॉक्टर कामावरच येत नाही असे दिसून येते. या सर्व डॉक्टरांची सभापती यांनी बैठक घ्यावी व त्यांना योग्य त्या सूचना दयाव्यात तसेच जे डॉक्टर खाजगी सेवा करीत आहे ती बंद करण्याची कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** सर्व सभागृहाचे मत लक्षात घेता आपल्या शहरामध्ये जी साथ चालू आहे यावर नियंत्रण करण्यास वैद्यकीय विभाग अतिशय कुचकामी ठरलेला आहे. कोणतेही गांभीर्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घेतले नाही. त्या विभागाचे विभाग प्रमुख या नात्याने सर्व जबाबदारी डॉ. जयश्री कुलकर्णी यांची आहे. पाहिजे तेवढया गंभीरतेने त्यांना हे प्रकरण हाताळता आले नाही किंवा त्यांना गांभीर्य वाटले नाही. त्यामुळे प्रशासन व प्रभारी आयुक्त यांना सूचना करतो की, त्यांचेकडे असलेला घनकचरा व्यवस्थापनाचा कार्यभार त्वरीत आजच्या आज दुसऱ्या एका सक्षम अधिकाऱ्यांकडे ताबडतोब देण्यात यावा व त्यांना सूचना करावी, की साथीचे रोग नियंत्रणात आणण्यासाठी काहीतरी नियोजन करण्यात यावे. निव्वळ कागदावर नियोजन नको. १००% अंमलबजावणी होईल अशा पध्दतीने नियोजन करावे. डॉक्टरांचे कामांचे तास ८ तास करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत या महापालिकेत ४ तास डॉक्टरांकडून

काम घेण्यात येत असे. किमान या साथीच्या रोगांची लागण चालू असतांना असे होऊ नये आणि पुन्हा एकदा सूचना देण्यात येते की, आजच्या आज या विभागावर दुसऱ्या कोणी सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी.

**श्री. त्र्यंबक तुपे :** मागिल एक वर्षापूर्वी महानगरपालिकेने या शहरातील दारिद्रय रेषेखालील नागरीकांचा सर्वे केला होता. त्यास एक वर्ष पूर्ण होत आहे. जे शहरातील नागरीक आहेत त्यांना रॉकेलसाठी, धान्य विकत घेण्यासाठी त्रास होत आहे. झालेल्या सर्वेची कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे एक वर्ष कालावधी लागलेला आहे. गरीबांचे हाल होतात.

**प्रकल्प संचालक :** दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण डिसेंबर २००५ मध्ये करण्यात आले. एकूण ७९ हजाराचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात शासनाकडून असे आदेशित झाले की सदर यादी ही इंग्रजी भाषेत असावी आणि ती यादी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावी. ट्रान्सलेशनसाठी फक्त २५ पैसे खर्च शासनाने मंजुर केलेला आहे. त्याप्रमाणे कुठलीही संगणक संस्था काम करण्यात तयार नाही. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांना एक पत्र देवून मागणी केली की, N.I.C. कडून काम करुन घेण्यात यावे किंवा ट्रान्सलेशनसाठी जे दर आहे ते वाढवून देण्यात यावे.

**श्री. रविकांत गवळी :** शासनाचे आदेश केंव्हा आले होते. जेंव्हा खुलासा मागविला तेंव्हाच अधिकारी सांगतात. यापूर्वी पदाधिकारी किंवा संबंधित विभागाशी चर्चा केलेली आहे काय?

**श्री. त्र्यंबक तुपे :** गरीब नागरीकाच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे सर्वे होवून ८ ते १० महिने झाले त्यानंतर कार्यवाही केली नाही.

**श्री. विनायक पांडे :** अनेक लोक नगरसेवकांच्या घरी येतात. व सर्वे झालेला असून आम्हाला कार्ड मिळाले नाही. यामुळे धान्य मिळत नाही म्हणून त्यांचे तक्रारी आहेत.

**श्री. हिम्मतराव दाभाडे :** ज्यावेळेस फॉर्म भरुन घेतले त्यावेळेसच इंग्रजीमध्ये दिले असते तर एवढा वेळ लागला नसता. गरीब लोकांना रॉकेल मिळत नाही. एक महिन्याच्या आत या संबंधीत निर्णय घेण्यात यावा व जे लोक दारिद्रय रेषेखालील येतात त्यांना कार्ड देण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री. त्र्यंबक तुपे :** संबंधीत अधिकारी यांना आदेश करावे की, सदर नावे मराठीतून इंग्रजीमध्ये एक दोन महिन्याच्या आत करुन कार्यवाही करावी.

**सौ. लता दलाल :** आताच अधिकारी यांनी सांगितले की, नावे इंग्रजी भाषेत भाषांतर करुन मागविले परंतू महानगरपालिकेचा संगणक विभागाचे प्रमुख हे प्रकल्प संचालकच आहे अशी माझी माहिती आहे. मनपाच्या प्रत्येक विभागात जवळपास संगणक आहेत. फॉर्म भरुन घेतांना मराठीतून की इंग्रजीतून भरुन घ्यायचा हे अधिकाऱ्यांना माहित असावे असे माझे मत आहे. सर्वे होवून एक वर्ष झाले आहे. एक दोन महिन्यापूर्वी अधिकारी यांना माहिती मिळाली असेल हे काम तातडीने महानगरपालिकेच्याच संगणक विभागाकडून केले असते तर हा प्रश्न आज उपस्थित झाला नसता. त्यांना पत्र दिले उत्तर आले नाही. याची वाट न पहाता जो जो बचतगट कर्मचारी वर्ग आपल्याकडे आहे त्यांचेकडून हे काम करुन घ्यावे तातडीने काम होईल याची दखल घ्यावी.

**मा.सभापती :** आहे त्याच कर्मचारी वर्ग यांचेकडून काम करुन घेतले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता असे मत स. सदस्यांनी व्यक्त केले. तात्काळ सर्वे होईल व नावे जातील याची काळजी घ्यावीत.

**सौ. लता दलाल :** एक लिपीक हे गंभीर अशा बलात्काराच्या प्रकरणात गुंतलेले होते. त्यांना माझ्या माहितीप्रमाणे ४८ तास पोलीस कोठडी ही झालेली आहे. त्यांना निलंबीत केले होते तरी त्यांना कुठल्या बेसवर पुन्हा कामावर घेतले आहे. एक कनिष्ठ अभियंता यांचे बाबतीत सहा महिन्यापूर्वी एक प्रकरण झाले त्यांचे बाबतीत त्यांना कामावर घेण्याची कार्यवाही केली नाही हे लिपीक असून कामावर घेतले आहे. या मागचे गूड काय आहे याचा खुलासा करावा.

**श्री.रविकांत गवळी :** महानगरपालिकेला क वर्गातून ड वर्गात समावेश करण्यात आले. एक कर्मचारी याचेसाठी वेगळी कार्यवाही व दुसऱ्या एका कर्मचाऱ्यासाठी वेगळी कार्यवाही केली जाते हे योग्य नाही. एका क. अभियंता यांना ताबडतोब निलंबीत करण्यात आले होते आताच स. सदस्या सौ. दलाल यांनी विचारणा केल्या प्रमाणे या संबंधी सर्व वर्तमानपत्रात बातमी आलेली होती संपूर्ण महाराष्ट्रात ई.टी.व्ही., झी टी.व्ही. मराठी बातमीपत्रात आहे. महानगरपालिकेचे एक लिपीक कर्मचारी एका बलात्काराच्या प्रकरणात समावेश होता. त्यांचेवर गुन्हा दाखल होवून त्यांना पोलीस कोठडी ही झालेली होती. त्या संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. मी मा. सभापती तसेच अस्थापना विभागास पत्र दिलेले होते अदयाप माहिती मिळालेली नाही.

**मा.सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी या बाबतीत खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त-**१ : महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. अन्सारी मोहमद मसीयोद्दीन यांना पोलीसांनी १७ तारखेला अटक केली होती व ते १९ तारखेपर्यंत कस्टडीत होते असा अहवाल दिनांक ०६/०५/२००६ रोजी पोलीसाकडून मिळाला. ४८ तासाच्या पेक्षा जास्त तास ते पोलीस कस्टडीत हाते. पोलीसाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांना निलंबीत करण्यात आले आहे.

**मा. जावेद मो.इसाक :** १५ ते २० दिवसांपूर्वी प्रभाग कार्यालय-फ मधील कॅशीयर यांनी महानगरपालिकेची काही रक्कम हडप केली महानगरपालिकेकडे भरणा केलेली नाही. प्रभाग अधिकारी यांनी त्यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे, जोपर्यंत अधिकारी यांचेवर कार्यवाही होत नाही तोपर्यंत त्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही होणार नाही. संबंधीतास निलंबीत का केलेले नाही. महानगरपालिकेचे तीन लक्षचे नुकसान झालेले आहे. कुणावरच कार्यवाही केलेली नाही.

**मा.सभापती :** यापूर्वीच्या बैठकीत मी निर्णय दिलेला होता की, सभागृहात कोणताही प्रश्न उपस्थित करतांना तीन दिवस अगोदर लेखी पत्र स. सदस्यांनी माझ्याकडे द्यावे ते संबंधीत अधिकारी यांना दिले जाईल व त्यानुसार सभागृहात खुलासा घेणे सोयीस्कर होईल. स.सदस्य यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या संबंधीत त्यांना संबंधीत अधिकारी यांनी पुढील बैठकीत उत्तर द्यावे.

**मा. जावेद मो.इसाक :** दिनांक १०/०३/२००६ रोजी मी उप आयुक्त महसूल यांना पत्र देवून जकात खाजगीकरणाची करारनाम्याची प्रत मागितली होती. उप आयुक्त यांनी असे उत्तर दिले की याची प्रत देवून शकत नाही. एजन्सीने ॲब्जेक्शन

घेतलेले आहे. नगरसेवक असूनही आम्हाला प्रत मिळत नसेल तर योग्य नाही.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री. मो. जावेद मो.इसाक यांना जकात खाजगीकरणाचे करारनाम्याची प्रत पुढील बैठकीच्या अगोदर प्रशासनाने दयावी.

**श्री. त्रिंबक तुपे :** लाईटची देखभाल दुरुस्तीची कामे व्हावी म्हणून प्रत्येक प्रभाग कार्यालयासाठी १० लक्षची तरतुद करण्यात आलेली होती. परंतू कोणत्याही वार्डात लाईटचे व्यवस्थित काम होत नाही. माझ्या वार्डात ३० टयूब लाईट लावण्यात आलेल्या आहे इतर कोणतेही काम केलेले नाही. याबाबतीत खुलासा घेण्यात यावा.

**श्री. विनायक पांडे :** कोणत्या वार्डात किती स्ट्रीट लाईट टयूब लाईट लावण्यात आलेले आहे याचा खुलासा घेण्यात यावा.

**मा. जावेद मो.इसाक :** एजन्सीला १० लक्षचा ठेका दिला परंतू देखभाल दुरुस्तीचे काम होते की नाही याकडे अधिकारी यांचे लक्ष नाही.

**श्री. रविकांत गवळी :** संबंधीत एजन्सीने माझ्या वार्डात लाईट लावले परंतू ते रात्र दिवस चालू असतात याची सुध्दा संबंधीत अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

**मा.**सभापती : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (विद्यु.)** : विद्युत देखभाल दुरुस्तीसाठी खाजगी ४ एजन्सीला काम दिले होते. या चारही एजन्सीने वार्डात कामे केलेली आहे. कोणत्या भागात काम केलेले आहे याची माहिती मा. सभापती यांचेकडे दिली जाईल.

**मा.सभापती :** सर्व सदस्यांचे असे म्हणणे आहे की, कुठेही काम झालेले नाही.

**उप अभियंता (विद्युत) :** अनेक ठिकाणी एजन्सीने लाईटची कामे केलेली आहे. वार्डाची संख्या जास्त असल्याने एजन्सीने एका वार्डाचे २०-३० ठिकाणी काम केले. २० ते २५ ठिकाणी काम चालू आहे. काही ठिकाणी पोल लावण्याचे काम होत आहे.

**श्री. रविकांत गवळी :** चार एजन्सीला ४० लक्ष रुपये देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी दिले होते. ३१ मार्च ही मुदत होती. या कालावधीपर्यंत सर्व लाईट चालू करावयास पाहिजे होते.

**उप अभियंता (विद्युत) :** तीन महिन्यापर्यंत मुदत दिलेली आहे. मार्च, एप्रिल, मे अशी मुदत आहे.

**श्री. त्रिंबक तुपे :** एक प्रभाग कार्यालयासाठी १० लक्ष रुपये याप्रमाणे किमान एका वार्डात ५० हजाराचे लाईट लावावयास पाहिजे होते. फक्त टयुबलाईट लावायचे काम केले. किती काम केले त्याचा संपूर्ण आढावा घ्यावा. काम झाल्यावर स.सदस्याची सही घ्यायची नंतरच बील देण्यात यावे. मी कोणासही सही करुन दिलेले नाही.

**सौ. लता दलाल :** आपल्याकडे कदाचित सक्षम ठेकेदार नव्हते. मुंबई सारख्या एजन्सीकडे ठेका दिला. काम केलेले नाही अपेक्षा भंग झालेला आहे. आतापर्यंत ९० ते ९५ टक्के काम होणे अपेक्षित होते. परंतू ५० टक्केही काम झाले नाही. आम्ही तक्रार केल्यानंतर २४ तासाच्या आत दखल घ्यावयास पाहिजे परंतू ती घेतली जात नाही. ज्या ज्या वार्डाच्या तक्रारी आहेत त्या त्या भागातील लाईट तात्काळ लावण्याचे आदेशित करावे व तोपर्यंत त्या एजन्सीचे पेमेन्ट थांबवावे. नसता त्यांचा करारा रद्द करावा.

**श्री.संजय शिरसाट :** महानगरपालिकेच्या इमारतीच्या बाजूला दिवसा लाईट चालू आहे याचे कारण काय?

**मा.सभापती :** खाजगी एजन्सीला लाईटचे काम दिलेले आहे. केलेल्या कामाचा अहवाल माझ्याकडे दयावा. ज्या ज्या ठिकाणी काम झालेले आहे त्याची माहिती नगरसेवकांना दिलेली नाही ती पण माहिती माझ्याकडे दयावी व संबंधीत एजन्सींना काम करण्यासाठी त्वरीत सूचना देण्यात याव्यात व त्याची माहिती नगरसेवकांना दयावी. काम होत नाही तोपर्यंत बील अदा करण्यात येवू नये.

**श्री. हिम्मतराव दाभाडे :** वार्ड ९० व ९२ मध्ये अनेक लाईट नादुरुस्त झालेले आहे. ते केंव्हा दुरुस्त होणार आहे.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री. दाभाडे यांचे सूचनाची दखल घेण्यात यावी. तसेच स. सदस्य श्री. शिरसाट यांनी केलेल्या सूचना बाबतही कार्यवाही करावी.

**डॉ. बिनवडे आशा :** रॅबीज लसीकरणा बाबत खुलासा घ्यावा.

**प्र.आरोग्य वैद्य.अधि. :** २८ मार्चला १२०० रॅबीज लसींची ऑर्डर दिलेली होती व ३१ मार्चला २३४३ इतक्या रॅबीज लसींची ऑर्डर दिलेली होती. याच एकूण खर्च ६,९९,९६७/- रु. इतका आहे. दोन दिवसांत ऑर्डर डिस्पॅच करणार आहे.

**विषय क्र. १२ :**

दिनांक २६/०४/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त (का.प.क्र.०२) कायम करणे.

**मा. सभापती :** इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २६/०४/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३ :**

(दि. २६/०४/२००६ च्या सभेत हा विषय पुढील सभेत ठेवण्याच्या झालेल्या निर्णयानुसार- विषय क्र.११)

मा. आयुक्त, महानगरपालिका प्रस्ताव सादर करत आहेत की, पावसाळयामध्ये होणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी १ ते ३१ मे २००६ या कालावधीत मान्सुनपूर्व विशेष स्वच्छता मोहीम घेणे आवश्यक आहे. या विशेष स्वच्छता मोहीमेत प्रभाग निहाय खालील प्रमाणे कृती योजना तयार करण्यात आली आहे.

१) प्रभाग क्र. १ ते ६ मधील प्रभाग अधिकाऱ्यांनी निवडणूक वार्डनिहाय विभागात साचलेला घनकचरा साफ करणे व उचलणे, तुंबलेले नाले व गटारे स्वच्छ करणे याबाबत तारीख निहाय सुक्ष्म कृती आराखडा सादर केला आहे.

२) स्वच्छतेचे दररोजच्या कामावर विपरीत परिणाम न होऊ देता ही विशेष मोहिम राबविण्यासाठी प्रभाग अधिकाऱ्यांनी अतिरिक्त कर्मचारी व अतिरिक्त वाहने यांचे मागणी केली आहे. महानगरपालिका आस्थापनेकडे सध्या हे मनुष्यबळ व वाहने उपलब्ध नसल्यामुळे खाजगी कंत्राटदारामार्फत एक महिन्यासाठी हे काम करुन घ्यावे लागेल.

३) सिडको प्रभागासाठी साफसफाईच्या काढलेल्या निविदामध्ये मा.स्थायी समितीकडून वाहनाचे व स्वच्छता कर्मचाऱ्यांचे दर मा. स्थायी समितीने मंजूर केलेले आहेत. तसेच कामगार कायद्याप्रमाणे प्रत्येक मजुरास किमान वेतन द्यावे लागेल.
४) या स्वच्छता मोहिमेत मलेरीया विभागामार्फत फावडा पार्टी मार्फत नाला वर्गीकरण, औषध फवारणी, धुरीकरण, गप्पी मासे सोडणे या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जाणार आहेत.
५) महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत पाणी नमुने घेणे, ड्रेनेज विभागामार्फत लिकेजेस शोधून काढणे या प्रतिबंधात्मक उपाययोजनासुध्दा या सोबत राबविण्यात येणार आहेत.
६) प्रभाग निहाय आवश्यक असणाऱ्या वाहनांचा व मजुरांचा व त्यावर येणाऱ्या खर्चाचा गोषवारा सोबत जोडला आहे.

तरी मा. स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.
(सोबत खर्चाचा गोषवारा)

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाट :** पावसाळयापूर्वी शहरातील साफसफाई होणे व कचरा उचलणे तसेच नाला सफाई होणे गरजेचे आहे.त्यासाठी ८.४३ लक्ष खर्च दाखविलेला आहे.सध्या असलेले सफाई कर्मचारी हे ११९७ दाखविलेले आहे. मागच्या वेळेस मी माहिती मागवली होती अधिकारी नव्हते म्हणून खुलासा केलेला नव्हता. किती कर्मचारी आहे खुलासा घ्यावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** सफाई कर्मचारी जे वार्ड कार्यालयात काम करतात ती संख्या ११९७ आहे हे बरोबर आहे. परंतू मी विविध ३४ विभागांची माहिती घेतली असता एकूण सफाई कर्मचारी १८४८ मजूर आहेत.

**श्री. संजय शिरसाट :** मजूर म्हणून १८४८ कर्मचारी आहे इतर विभागात आहे असे म्हटले. मजूर म्हणून आहे. इतर विभागात कसे दिले.

**सहाय्यक आयुक्त-१ :** मुळ नियुक्ती मजुर म्हणून आहे, परंतू इतर विभागात ते काम करतात.

**श्री. संजय शिरसाट** : ६५० मजूर म्हणून नियुक्ती असलेले कर्मचारी हे पदाधिकारी तसेच अधिकारी यांचे दालनावर काम करतात इतके कर्मचारी लागतात काय ? अधिकाऱ्याची एकूण पदे किती आहेत.

**सहाय्यक आयुक्त-१ :** संवर्ग १ मध्ये १२, संवर्ग-२ मध्ये ६२ एकूण ७२ पदे आहेत.

**श्री.संजय शिरसाट :** आताच अधिकारी यांनी खुलासा केला ७२ अधिकाऱ्याची पदे आहे पदाधिकारी मिळून ८० होतील एवढया अधिकारी पदाधिकारी यांचेकडे काम करण्यासाठी ६५० कर्मचारी लागतात काय?

**सहाय्यक आयुक्त-१ :** सर्व विभागामध्ये हे कर्मचारी आहे. त्यामध्ये उद्यान, प्राणी संग्रहालयातील ही कर्मचारी आहेत.

**श्री.संजय शिरसाट :** १८४८ सफाई कर्मचारी असतांना २०० कर्मचारी घेण्यासाठी हा टेंडरचा प्रस्ताव मंजुरीसाठी येतो. ६५० कर्मचारी सफाईचे कामासाठी नाही इतर विभागात आहेत. त्यातून २०० कर्मचारी या सफाईसाठी घेण्यात यावे.

**मा.सभापती :** सभागृहाचे मत लक्षात घेता महानगरपालिकेकडे सफाई कर्मचारी असतांना बाहेरील कर्मचारी घेण्याची आवश्यकता नाही. अगोदर आहे त्या महानगरपालिकेतीलच कर्मचारी यांचा वापर करुन शहरातील साफसफाई स्वच्छता मोहिम यशस्वीरित्या राबवावी अशा स्पष्ट सूचना देण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. विशेष स्वच्छता मोहिमे अंतर्गत पावसाळयापूर्वी करावयाचे सफाईचे काम उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउबां) हे प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको कार्यालयाची इमारत मोठया हॉलच्या स्वरुपात आहे. सदर ठिकाणी पार्टीशन करुन अधिकारी कर्मचारी यांची बसण्याची व्यवस्था करणे तसेच समोरील जागेत लँड स्केपींग, पार्कींग व इतर कामे करणेस्तव नियोजन करणे, सविस्तर नकाशे, अंदाजपत्रक मागविणेस्तव वास्तु विशारद मे. सामिल अँड असोशिएटस् यांचेकडून सदरील कामे करुन घेणेस्तव मा. आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मे सामिल अँड असोशिएटस् (वास्तुविशारद) यांच्याकडून सदरील कामे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% या दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**सौ.लता दलाल :** या प्रस्तावाच्या बाबतीत खुलासा करावा. एकाच वास्तूविशारद यांचे नाव कसे आले.

**अति.शहर अभियंता :** सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झाले त्यानंतर सिडको कार्यालयाची जी इमारत आहे त्यातील ५० टक्के इमारत महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेचे कार्यालय करायचे आहे. त्या इमारतीत कर्मचारी यांना बसण्यासाठी तसेच जी मोकळी जागा आहे तेथे सुशोभिकरण करायचे आहे. त्यासाठी मे. सामिल अँड असोशिएटस् वास्तुविशारद यांचेकडून नकाशे व अंदाजपत्रक मागविणेस्तव प्रस्ताव ठेवलेला आहे. त्यांना कामाचा अनुभव आहे.

**सौ. लता दलाल :** एकच वास्तुविशारद शहरात आहेत का? एकच नाव कसे आहे?

**अति.शहर अभियंता :** आणखी वास्तूविशारद आहे. परंतू यांनी महानगरपालिकेत काम केलेले आहे. कामाचा अनुभव आहे.

**मा. सभापती :** सदर एजन्सीने यापूर्वी काम केलेले असून त्यांना अनुभव आहे. असा खुलासा संबंधीत अधिकारी यांनी केलेला आहे. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको कार्यालयाचे इमारतीत पार्टीशन करुन अधिकारी कर्मचारी यांची बसण्याची व्यवस्था करणे तसेच समोरील जागेत लँड स्केपींग, पार्कींग व इतर कामे करणेस्तव नियोजन करणे, सविस्तर नकाशे, अंदाजपत्रक मागविणेस्तव वास्तु विशारद मे. सामिल अँड असोशिएटस् यांचेकडून सदरील कामे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १ % या दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, अर्थसंकल्प सन ००६-२००७ मध्ये मंजुर होणाऱ्या कामापैकी जास्तीत जास्त कामे ही संबंधीत वार्डाचे वार्ड अभियंता यांचेकडून करुन घ्यावयाची आहेत. तसेच मुख्यालयातील कार्यरत उप

अभियंता यांचेकडील कामाचा व्याप पहाता व त्यांचेकडील उपलब्ध कनिष्ठ अभियंता यांची संख्या पाहता सदरील कामाची अंदाजपत्रके ही विहित मुदतीत होणे शक्य नाही. त्याकरीता सुशिक्षित बेरोजगार अभियंते यांची नियुक्ती अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके तयार करण्याकरीता करणे योग्य असून त्यास्तव पंजीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.२५% दराने मोबदला देण्याच्या अटीवर अंदाजपत्रके तयार करुन घ्यावयाचे प्रस्तावित आहे. अशा नियुक्ती पंजीकृत अभियंत्यांनी तयार केलेली अंदाजपत्रके संबंधीत विभागाच्या क. अभियंता यांनी तपासणी करुन मंजुरीसाठी सादर करावयाची आहेत. यासाठी संबंधीत खाजगी / सुशिक्षित/ बेरोजगार अभियंता यांना कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.२५% दराने कामाचा मोबदला म्हणून द्यावयाच्या मोबदला करीता अंदाजे रक्कम रु. ६.०० (सहा) लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा प्रत्येक विकास कामाच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे.

करीता महानगरपालिकेतील विविध विभागातील विकास कामांची अंदाजपत्रके हे खाजगी/ सुशिक्षित/ बेरोजगार पंजीकृत अभियंता कडून कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.२५% दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे :** जी तरतुद अर्थसंकल्पात विकास कामासाठी केलेली आहे त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी हा प्रस्ताव दिलेला आहे. महानगरपालिकेकडे असलेले कर्मचारी वर्ग कमी पडतो. पुन्हा सहा महिने लागू शकतात. हे कारण पुढे करून जर दोन महिन्यातच अंदाजपत्रक तयार करावयाचे असेल तर बाहेरील खाजगी अभियंता यांचेकडून त्यांना ०.२५ टक्के मोबदला देवून हे अंदाजपत्रक तयार करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे याचा अर्थ ६ लक्ष रुपये हे विकास कामामधून यासाठी दयावे लागणार आहे. आजच परिस्थिती अशी की, प्रशासकीय खर्च हा ४५ टक्के होत आहे. विकास कामावर कमी खर्च होतो पुन्हा त्यातून अशा पध्दतीने कामे द्यायची हे बरोबर वाटात नाही. नुकतेच वृत्तपत्रात आहे की महानगरपालिका क वर्गातून ड वर्गात आलेली आहे. विकास कामे कमी व इतर खर्च जास्त असे असतांना पुन्हा बाहेरील लोकांना कामे देण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवला जातो हे योग्य नाही. आता ४५ टक्के खर्च करण्याऐवजी ३५ टक्केच प्रशासकीय खर्च करायचा आहे. म्हणून जे महानगरपालिकेचे कर्मचारी अधिकारी आहेत त्यांचेकडूनच अंदाजपत्रक तयार करण्याचे काम वेळीच करुन घ्यावे. असे मला वाटते.

**श्री. त्रिंबक तुपे :** प्रभाग कार्यालय झालेले आहे. एका अभियंता यांना दोन किंवा तीन वार्ड येतात म्हणून त्यांना अंदाजपत्रक तयार करण्यास फारसा वेळ लागणार नाही. काम करणे कठीण नाही. बिलींग काम ही देण्याचे याचे बिलींगचे काम महानगरपालिकेच्या अभियंत्याकडे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम बाहेरच्या अभियंत्याकडे हे बरोबर वाटत नाही. महापालिकेचे जे.ई. आहे. त्यांचेकडून हे काम ठराविक वेळ देवून करुन घेण्यात यावे.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिका अस्तित्वात येवून २३ वर्ष झाली पहिल्यांदा असा प्रस्ताव मंजुरीसाठी येतो. सर्वांची अशी धारण आहे की अभियंता यांना नोकरी देतांना त्यांचेकडे पात्रता आहे की नाही हे पाहिले जाते. अंदाजपत्रक तयार

करणे खर्चाचा ताळेबंद काढणे, त्याचे मेजरमेंट घेणे ही कामे करावी लागतात. महानगरपालिकेकडे सक्षम अभियंता आहेत. जर ते अंदाजपत्रक तयार करु शकत नसतील तर ते सक्षम नाहीत ते पात्र नाही असे वाटते. म्हणून जे कार्यरत अभियंता आहे त्यांना एवढे जास्तीचे पगार दयाचे का असा प्रश्न येतो. जरे हे काम बाहेरील अभियंता यांना दयायचे असतील तर त्या संबंधीत अभियंता यांचे पगारातून खर्च देण्यात यावा. कालच बातमी आलेली आहे. इतर महानगरपालिका खालच्या वर्गातून वरच्या वर्गात जातात परंतू या महानगरपालिकेला वर्ग क मधून ड मध्ये टाकण्यात आलेले आहे. असे असतांना सुध्दा असे प्रस्ताव मंजुरीसाठी येतात यापेक्षा दुर्दैव काय असू शकते. यापुढे असे प्रस्ताव येवू नये व जे अभियंता महानगरपालिकेकडे आहे त्यांचेकडून काम करुन घ्यावे ते काम करण्यास सक्षम आहेत ते क्षमता सिध्द करुन दाखवतील अशी खात्री आहे.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी जे मत या विषयावर व्यक्त केले ते योग्य आहे. सर्व विभाग प्रमुखांना या संबंधाने सुचना देण्यात येत आहे की, अंदाजपत्रक तयार करण्याचे काम दरवर्षी परंपरा, प्रथे प्रमाणे महानगरपालिकेच्याच कनिष्ठ अभियंता यांचेकडून वेळेच्या आत करुन घ्यावे. सर्व अभियंता हे सक्षम आहे असे सभागृहाचे मत झालेले आहे. सर्वाचे मत झालेले आहे. तात्काळ अंदाजपत्रक कसे तयार होतील योच नियोजन करावे अशा सूचना देण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. अंदाजपत्रके तयार करण्याचे काम महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता यांचेकडून वेळेच्या आत करून घ्यावे, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## -:ऐनवेळचे विषय :-

**विषय क्र. १६ :**

दिनांक ०९/०५/२००६ रोजी सायंकाळी वार्ड क्र. ९८ नक्षत्रवाडी अंतर्गत असलेल्या कांचनवाडी येथील एका हॉटेलमध्ये गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत जवळपास ४० पेक्षा अधिक लोक भाजल्यामुळे गंभीररित्या जखमी झालेले आहेत. हे सर्व लोक गोरगरीब असून मोलमजुरी करणारे आहेत. त्यांना उपचारार्थ घाटी दवाखान्यात दाखल करण्यात आलेले आहे. परंतु गरीबी परिस्थितीमुळे औषधोपचाराचा खर्च देखील हे लोक करु शकत नाहीत. त्यामुळे घाटी दवाखान्यामध्ये या दुर्घटनेत आगीमुळे जखमी झालेल्या रुग्णांना महानगरपालिकेकडून रक्कम रु. १.०० लाखापर्यंत औषधी स्वरुपात तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : रविकांत गवळी, सौ. लता दलाल

अनुमोदक : संजय शिरसाट, दिलीप गायकवाड.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०९/०५/२००६ रोजी सायंकाळी वार्ड क्र. ९८ मधील कांचनवाडी येथील एका हॉटेलमध्ये गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत भाजल्यामुळे गंभीर जखमी झालेल्या ज्या रुग्णांना उपचारार्थ घाटी दवाखान्यात दाखल

करण्यात आलेले आहे अशा रुग्णांना महानगरपालिकेकडून रक्कम रु. १.०० लाखा पर्यंतची मदत औषधी स्वरुपात तात्काळ उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.इ.उ.) यांचेकडून स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१) विकासनगर येथे २००५-२००६ मध्ये Concrete Pathway करण्याचे कामाचे कार्यादेश पारित केले असून ड्रेनेज M&R कामांतर्गत ड्रेनेज लाईन बदलण्याच्या खोदकामामुळे सदर कामास्थगित केलेले आहे. सदरील ड्रेनेज M&R चे काम त्वरीत करणे आवश्यक असून सदरील कामाचे रक्कम रु. १,८१,२००/- चे अंदाजपत्रकास मान्यता झालेली आहे.

२) पन्नालालनगर येथेही वरील प्रमाणे Concrete Pathway चे काम करावयाचे असुन तत्पुर्वी ड्रेनेज M&R चे ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम करावयाचे असून या कामाचे रक्कम रु. १,४६,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता झालेली आहे.

कामाची तातडी पाहता उक्त दोन्ही कामे त्वरीत करुन घेण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम (२) प्रमाणे सदर काम उपलब्ध गुत्तेदारामार्फत करुन घेण्याच्या कार्यवाहीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सदरील कामे करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विकासनगर येथे ड्रेनेज M&R कामांतर्गत रक्कम रु. १,८१,२००/- चे ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम तसेच पन्नालालनगर येथेही वरील प्रमाणे ड्रेनेज M&R चे रक्कम रु. १,४६,०००/- चे ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम तातडीने करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे कामांची तातडी लक्षात घेता सदरील दोन्ही कामे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) प्रमाणे सदर काम उपलब्ध गुत्तेदारामार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

'राष्ट्रगितानंतर' सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.